**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्ध पत्रक**

- **सफाई कर्मचाऱ्यांसाठी ‘अवकारिका’ या प्रेरणादायी चित्रपटाचा विशेष शो**

मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा ( भा.प्र. से.) यांच्या मार्गदर्शनाखाली घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने सफाई कर्मचारी बांधवांसाठी ‘ **अवकारिका** या विशेष चित्रपटाचे आयोजन करण्यात आले होते. दिग्दर्शक अरविंद भोसले दिग्दर्शित हा चित्रपट भाईंदर (पश्चिम) येथील मॅक्सिक्स मॉलमध्ये दिनांक 1 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 10 वाजता दाखविण्यात आला. **सफाई कर्मचाऱ्यांच्या जीवनातील संघर्ष, मेहनत आणि त्यांचे समाजातील मोलाचे योगदान** या विषयावर आधारित असलेल्या या चित्रपटाने उपस्थितांचे मन खरोखरच हेलावून टाकले.

या चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनात नवीन प्रेरणा निर्माण केली तसेच उपस्थितांचे मनोरंजन केले.या विशेष शो ला मिरा भाईंदर महानगरपालिका उपायुक्त डॉ. सचिन बांगर, कार्यकारी अभियंता नितीन मुकणे, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रमोद पडवळ, सहाय्यक आयुक्त योगेश गुणीजन, स्वच्छता निरीक्षक, मनपाचे इतर अधिकारी तसेच महिला व पुरुष सफाई कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते महानगरपालिकेच्या या उपक्रमामुळे सफाई कर्मचारी बांधवांना आपल्या कार्याचा अभिमान वाटून पुढील काम अधिक उत्साहाने करण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.